आदिवासी क्षेत्र उपयोजना आदिवासी क्षेत्राबाहेरील
उपयोजना सन २०१२-१३ चे राज्यस्तरीय योजनानिहाय
अर्थसंकल्प तरतूदीचे वाटप **"पीक संवर्धन"**

# महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग
**शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१२/प्र.क्र.११/का.६**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक :- १५ सप्टेंबर, २०१२.**

**वाचा :** १) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.बीजीटी २०.१२/प्र.क्र.५५/अर्थसंकल्प-३, दि.३१.३.२०१२.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अंदाज २०.१२/प्र.क्र.६४/अर्थसंकल्प-३, दि.४.५.२०१२.
३) कृषि व पदुम विभागाची नस्ती क्र.पंदेकृवि २०१२/प्र.क्र.८७/२०१२/८-अे

**शासन निर्णय :-** आदिवासी उपयोजनांतर्गत **"पीक संवर्धन"** या उपशिर्षाखाली २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करण्यात आलेल्या तरतुदीचे व योजनांचे वाटप आणि प्रत्येक योजनांचे अंमलबजावणी अधिकारी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविले आहेत. आदिवासी उपयोजनेंतर्गत डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत गडचिरोली-सोनापूर येथे कृषि महाविद्यालय सुरु करणे याकरिता निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. नियंत्रण अधिकारी आणि विभागप्रमुख यांनी ही तरतुद शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का.५ दिनांक ९.३.१९९० अन्वये निश्चित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील मान्य कार्यक्रमांवर/योजनांवर खर्च होतील याची दक्षता घ्यावी. तसेच या तरतूदी खर्च करतांना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.टिएसपी-२००३/प्र.क्र.१०१/का-६, दिनांक २६ जुलै, २००४ व टिएसपी-२००५/प्र.क्र.५९/का-६, दिनांक १० नोव्हेंबर, २००५ मधील अटींचे कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी तसेच प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरित करण्यात येत असलेल्या तरतूदी मासिक खर्च विवरणपत्राप्रमाणे खर्च करण्याची दक्षता सर्व नियंत्रक अधिका-यांनी घ्यावी. सदर तरतूदी संगणक वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल व तो केंद्रशासनाला कळविता येईल.

४. सर्व नियंत्रण अधिका-यांनी योजनावार मासिक खर्चाची विवरणे आदिवासी क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी व आदिवासी क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी स्वतंत्रपणे विहीत प्रपत्रात ज्या महिन्यात खर्च झाला असेल त्याच्या पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत या विभागास, नियोजन विभाग, वित्त विभाग व इतर संबंधित प्रशासकीय विभाग व आदिवासी विकास, आयुक्त यांचे कार्यालय, नाशिक यांना पाठवाव्यात.

५ आदिवासी उपयोजनेची तरतूद आदिवासी क्षेत्राबाहेर खर्च झालेली आढळल्यास याबाबत संबंधित विभागातील क्षेत्रिय अधिकारी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास, संबंधित

जिल्हाधिकारी व प्रकल्प अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल. तसेच आदिवासी उपयोजनेंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल लेखाशिर्षनिहाय/उप लेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती प्रशासकीय विभाग तसेच प्रकल्प अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व आदिवासी विकास विभागास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत न चुकता पाठवावी.

६. नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख यांनी नियम प्रचलित कार्यपध्दती व सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन चालू योजनांवर खर्च करावा. हे आदेश फक्त अंमलबजावणी /नियंत्रक अधिका-यांच्या अधिनस्त ठेवलेल्या तरतुदीस प्रशासकीय दृष्टया मान्य केलेल्या चालू योजनांवर खर्च करण्यासाठी आहे. याची अंमलबजावणी अधिका-यांनी नोंद घ्यावी.

**७. आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्र उपयोजना (टिएसपी) व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना (ओटिएसपी) यांचा खर्च स्वतंत्रपणे नोंदविण्यासाठी लेखाशिर्षामध्ये काही बदल करण्यात आले असल्यास हे बदल लक्षात घेवून खर्च नोंदविताना सुधारित लेखाशिर्ष नोंदविण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.**

८. सदर शासन महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचां संगणक सांकेतांक क्र.२०१२०९१५१०१२४५२१०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श. र. सावंत)
कार्यासन अधिकारी

**प्रति,**

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास
सर्व विभागीय आयुक्त,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर. (२ प्रती)
कृषि व पदुम विभाग (पदुम-३ / पदुम-४), मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
निवड नस्ती (का-६)

## आदिवासी क्षेत्र उपयोजनेखालील सन २०१२-१३ चे जिल्हानिहाय अंदाजपत्रकीय तरतूदीचे वाटप

<table>
<tr><td colspan="2">शिर्ष : पीक संवर्धन<br>योजनेचे नाव :- डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ<br>(राज्यस्तर)<br>(रुपये हजारात)</td><td colspan="3">मागणी क्रमांक :- टी-५<br>मुख्य लेखाशिर्ष :- २४०१- पीक संवर्धन- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०३) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ<br>(२४०१ ८२९१) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर)</td></tr>
<tr><td>जिल्हयाचे नाव</td><td>२०१२-१३ साठी केलेली तरतुद</td><td>२०१२-१३ ची पूरक तरतुद सुपुर्द करण्यात आलेला नियंत्रण अधिकारी</td><td>प्रशासकीय विभाग</td><td>शेरा</td></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr>
<tr><td>एकुण</td><td>१५००००</td><td>सचिव,<br>कृषि व पदुम विभाग,<br>मंत्रालय</td><td>कृषि व पदुम विभाग,मंत्रालय, मुंबई.</td><td></td></tr>
</table>